
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय दा. वा.
दा.क्र. ९२७९

# देव दीनाकडे धावला

सौ. सुसंगति गोरवले



BVBK-0401279

१२८९
३।७।८९

लहान मुलांसाठी

प्रौढसाक्षरांसाठी

# देव दीनाकडे धावला

: लेखिका :

सौ. सुसंगति गोखले

१२८९ दि० ३।७।८९

BVBK-0401279

प्रकाशन : ३

प्रकाशिका ;
सौ. सुप्रिया श्रीकांत डंके
पंढरी प्रकाशन,
नवी पेठ, पंढरपूर.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
पंढरी प्रकाशन
C/o अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०

किंमत तीन रुपये

मुद्रक :
रा. गो. पाटील
ज्ञानेश्वरी प्रेस
१४५७ शुक्रवार पेठ,
पुणे ४११००२.

प्राप्तिस्थान :
अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०.

---


देव–भक्तसंबंधाची अपूर्वाई काय सांगावी ! भक्ताला देवदर्शनासाठी तळमळ लागलेली असते; तशीच भक्ताची इच्छा पूर्ण करण्याची देवालाही ओढ असते.

भक्त कूर्मदास थोटेपणामुळे देवापर्यंत पोहोचू शकत नसेल तर देव त्याच्यापर्यंत येईल; चोखा आणि सोयरा यांना समाजाने बहिष्कृत केलेले असले, तरी त्यांची भक्ती एवढी मोठी ठरते की देव त्यांच्या घरी जेवायलाही जाईल; लौकिकात भक्त जनाई दासी मानली गेली तरी देव तिच्या भक्तीची पावती देईलच ! अशा भक्तांच्या या कथा तुम्हाला आवडतील असे वाटते.

– लेखिका

म. ग्रं. सं. ..., ..., ... शाखा.
लाल ...
वा, क्र. १२८६ दिनांक ३/८/६९
विषय ............. क्र.............

## देव दीनाकडे धावला



पैठणच्या श्रीविष्णूच्या देवळात त्या दिवशी खूप गर्दी जमली होती. त्या दिवशी केशवबुवा पंढरपूरकर यांचं देवळात कीर्तन होतं. कीर्तनकार म्हणून पंढरपूरकरबुवा यांचं नाव सर्वत्र प्रसिद्ध होतं. त्यामुळंच आज देवळात पैठणकर मंडळींनी गर्दी केली होती. त्या दिवशी बुवांनी पंढरी-क्षेत्राचं मोठेपण आणि भक्त पुंडलिकाची कथा यावर कीर्तन केलं. सारेजण बुवांच्या कीर्तनावर खूष झाले. कीर्तनाच्या शेवटी बुवांनी म्हटलं, "तर सुजनहो, आता एकदा आपण सारे मिळून पंढरीनाथाच्या नामाचा गजर करू या बोला,

'जय जय विठ्ठल ।
जय हरि विठ्ठल ॥'

सगळे बुवांच्या बरोबर विठ्ठलाच्या नावाचा गजर करूं लागले. 'जय जय विठ्ठल । जय हरि विठ्ठल ॥'

नामाचा गजर करताना बुवा आणि श्रोते असे सारेच त्यात रंगून गेले. बुवा तर एवढे गुंग होऊन गेले कीं ते तोंडानं देवाच्या नावाचा गजर करता करता पुढे—मागे होत नाचू लागले. कीर्तनाला जमलेले सगळे लोकही हातांनी टाळ्या वाजवत आणि जोरजोरानं डोलत तोंडानं विठ्ठलनाम म्हणत राहिले.

अशावेळी देवळाच्या एका कोपऱ्यात एका खांबाला टेकून एक माणूस बसला होता. त्याचे डोळे मिटलेले होते, विठ्ठल विठ्ठल म्हणताना त्याचे ओठ भरभर हालत होते आणि त्याचं सारं अंग गदगदा हालत होतं. पण तो हातानं टाळ्या मात्र वाजवत नव्हता. कशा वाजवणार तो टाळ्या ? त्याला हात होतेच कुठं ? हात नव्हते कीं पायही नव्हते. जन्मापासून तो असाच हात आणि पाय नसलेलाच होता.

कूर्मदास हे त्या माणसाचं नाव !

कूर्मदासाला जन्मापासूनच हात-पाय नव्हते हे खरं, पण त्यानं या दुर्दैवाबद्दल वाईट वाटून घ्यायचं नाही असं ठरवलं होतं. आपलं मन देवाच्या भक्तीत

गुंतवून टाकून तो आनंदात राहात होता. त्याच्या मनमिळाऊ स्वभावामुळें आणि नम्र वागण्यामुळें तो सर्वांना आवडत असे.

कूर्मदास रोज देवळात जात असे. तिथं जाता-येताना त्याला खुरडत, ठेचकाळत जावं लागे. त्याला खूप त्रास होई पण देवाच्या दारी जाण्यानं, देवाच्या दर्शनानं त्याला खूप समाधान वाटत असे. या समाधानापुढे त्यामुळें होणाऱ्या त्रासाचं त्याला काही वाटत नसे.

त्या दिवशी केशवबुवांचं कीर्तन ऐकत असताना कूर्मदास अत्यंत रंगून गेला. पंढरीचं आणि पंढरीनाथाचं वर्णन ऐकून त्याच्या मनाला फार आनंद झाला. कीर्तनाच्या शेवटी शेवटी तर तो मनानं जणू पंढरपूरला पांडुरंगाच्या जवळच जाऊन पोहोचला होता.

कीर्तन संपलं होतं, बुवांनी आवराआवर सुरू केली होती, गर्दी हळू हळू ओसरत होती. कूर्मदास मात्र डोळे मिटलेल्या अवस्थेत थरथरत्या ओठांनी विठ्ठलाचं नाव घेत तसाच बसून राहिला होता. कोणाचं तरी त्याच्याकडं लक्ष गेलं. त्या माणसानं कूर्मदासाला

हाक मारून जाग आणली आणि म्हटलं, 'काय कूर्मदास ! कुठं ध्यान लावलयं ? संपलं कीं कीर्तन, घरी नाही कां जायचं ? '

'अहाहा ! मी मनानं पंढरीलाच पोचलो होतो. आता घरी जाण्यापेक्षा पंढरपूरलाच जावं आणि पंढरीनाथाचं डोळे भरून दर्शन घ्यावं असं वाटू लागलं आहे ! ' कूर्मदास मोठ्या आनंदानं बोलला. पण या त्याच्या उत्तरानं तिथं जमलेल्या लोकांमध्ये मात्र हंशा पिकला. कोणी म्हणालं, ' काय वेड का काय ! पैठण-पासून पंढरपूर हे काय लहान अंतर आहे ? आणि तुझी ही अशी अवस्था. चल बाबा घरी. तुझ्याच्यानं कसला निभणार तो प्रवास ! '

कूर्मदास सगळ्यांचं बोलणं ऐकत होता. पण त्याचा निश्चय मात्र अढळ होता. त्यानं बुवांना पंढर-पूरचा रस्ता विचारला, तेव्हा त्या बुवांनीही त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. तरीही कूर्मदास आपला विचार सोडून द्यायला तयार होईना. तो लगेचच निघालाही. त्याच्या खुरडत जाणाऱ्या पाठ-मोऱ्या आकृतीकडे पाहून लोक म्हणाले, ' आता ह्याला देवाघरी गेल्यावरच देव भेटणार ! ' बुवा मात्र सहज

म्हणाले, 'काय सांगावं ! प्रयत्न केल्यावर देव दूर राहात नाही. हा भक्त देवापर्यंत पोहोचला नाही तरी तो दीनांचा नाथच याच्याकडे येईल ! '

बुवांचे शब्द कूर्मदासाच्या कानावर पडले. त्याला फार आनंद झाला. आपल्या प्रामाणिक प्रयत्नाला पंढरीनाथ खात्रीने यश देईल अशा विचारानं त्याचा उत्साह वाढला. त्याच्या खुरडत जाण्यातही आता थोडा वेग आल्यासारखे वाटू लागले.

पंढरपूरच्या दिशेने अत्यंत कष्टाने कूर्मदासाचा प्रवास चालूच राहिला होता. वाटेत एखाद्या देवळात रात्रीचा मुक्काम करावा आणि दिवसा होईल तेवढे अंतर मागे टाकावे, असा त्याचा क्रम चालू होता. पैठणपासून काही अंतर दूर पोहोचल्यावर त्याला मधून मधून पंढरीला जाणारे लोक भेटू लागले. त्यांच्याशी बोलून कूर्मदास पंढरीची आणि पांडुरंगाची चौकशी करत असे. लोकही त्याला मोठ्या प्रेमानं ती माहिती सांगत असत. तसेच ते लोक कूर्मदासाचीही चौकशी करत असत आणि त्याला धीर देत असत. पण त्यांच्या मनात विचार येई कीं, या भक्ताच्या प्रयत्नाला यश येणारं तरी केव्हा !

प्रयत्नाच्या शेवटी परमेश्वर भेटतोच अशा विश्वासाने कूर्मदास पुढें जात राहिला होता. त्याच्या दीनवाण्या प्रयत्नाबद्दल सर्वांनाच कौतुक वाटत होतं. अजून पंढरपूर खूपच दूर होतं. पण एकादशी जवळ आल्यामुळं पंढरपूरला पोहोचण्याच्या घाईत सारे विठ्ठलभक्त घाईघाईनं पुढं जात होते. अशा अनेक भक्तांना वाटेत कूर्मदास भेटला होता. त्या वारकरी भक्तांचं लक्ष आपल्याकडं वेधून घेताना कूर्मदास कळवळून 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल !' असा नामघोष करी. वारकरीहि कूर्मदासाच्या नामघोषाला प्रतिसाद देत; मग काही वारकरी भक्तांना जवळ बोलावून कूर्मदास म्हणायचा, 'भक्तहो, तुम्ही भाग्यवान आहात; पंढरीला जाऊन पांडुरंगाचं दर्शन घेणार आहात ! पण माझ्या नशिबात ते पुण्य नाही. बाबांनो, माझ्यावर दया करा. विठ्ठलाला दंडवत सांगा नी मला इथंच दर्शन द्यायला विनवणी करा. कराल एवढं ?'


एकादशीला पंढरपुरात यात्रेला जमलेल्या अनेकांच्या तोंडी कूर्मदासाचा विषय होता. त्याच्या दीनवाण्या अवस्थेची त्यांना कीव वाटत होती पण त्याच्या गाढ भक्तीचं त्यांना फार कौतुक वाटत होतं.

पंढरपुरात भक्तांच्या मेळाव्यात चाललेली कौतुकाची बोलणी कूर्मदासाच्या कानावर जात नसली तरी सर्वांचे अंतरंग जाणणाऱ्या पंढरीनाथाला ती बोलणी न समजतील तरच नवल ! आपल्या दर्शनासाठी प्रत्यक्ष पंढरपूरात जमलेल्या भक्तांच्या भक्तीएवढीच कूर्मदासाची भक्तीही मोठी आहे हे त्या पंढरीनाथाने केव्हांच ओळखले होते. आता तर त्याच्या भक्तांनीही कूर्मदासाची भक्ती मान्य केली होती.

पंढरीनाथ आपल्या दीनदुबळ्या भक्ताच्या भेटीला धावतो. ते त्याचं भक्तप्रेम कूर्मदासाच्या भक्तीनं उचंबळून आलं. देव आपल्या दीन भक्ताच्या भेटीसाठी त्याच्याकडे निघाला. लहूळ गावाच्या जवळ कूर्मदास थकून बसला होता. त्याच्या तोंडातून विठ्ठलाचे अखंड नामस्मरण चालूच होते. अशा त्या व्याकूळ कूर्मदासाच्या दीनवाण्या अवस्थेत एकाएकी एक अपूर्व अशी जाणीव निर्माण झाली. कूर्मदासाला त्याच्या समोर अवचित प्रकाश दिसू लागला. त्या प्रकाशाच्या दिशेने अधिक लक्षपूर्वक पाहिल्यावर कूर्मदासाला साक्षात् पंढरीनाथाचे दर्शन घडले.

पैठणला कीर्तनात बुवांनी वर्णन केल्याप्रमाणे

पंढरीनाथाच्या मूर्तीची आपल्या मनात कूर्मदासाने स्थापना केली होती. तशीच मूर्ती समोर दिसू लागल्याने कूर्मदासाचा आनंद त्याच्या मनांत मावेना !




पंढरीनाथाच्या दर्शनानं भक्त कूर्मदास आनंदला; परंतु आपल्या त्या थोर भक्ताची भक्ती पाहून पंढरीनाथही सुखावला होता.

'कूर्मदासा, तुझ्या भक्तीनं मी संतुष्ट झालो आहे. तुला हवं ते माग. तुझी इच्छा पूर्ण होईल.' पांडुरंगाने आशीर्वादपूर्वक म्हटले.

त्यावर कूर्मदास म्हणाला, ‘ देवा, आपण मला दर्शन दिलंत यातच मला सारं पावलं ! ’

‘ देवा आपण या दीनाकरता एवढे श्रम घेतलेत ! मी धन्य झालो. हा दीनभक्त देवापर्यंत पोहोचू शकला नाही. पण दीनदयाळू देवच दीनाकडे धावला ! ’

‘ देव दीनाकडे धावला ! ’

## देव दीनाघरी जेवला



मंगळवेढे हे गाव पंढरपुरापासून तसे फार लांब नव्हते. पंढरपूरच्या पांडुरंगाला आपले दैवत मानून दूरदूरचे भक्त पंढरपूरला नित्य येत. पांडुरंगाच्या भक्तीत रंगलेली असंख्य भक्तमंडळी विठ्ठलनामाचा जयजयकार करीत, टाळ-मृदंगांच्या तालावर भक्तीपूर्ण अभंग गात पंढरीच्या दिशेनं सतत जात येत असत. मंगळवेढ्याचा परिसर यात्र दृश्यांनी फुलून गेलेला असे.

मंगळवेढ्याला राहणारा चोखोबा पांडुरंग, पंढरपूर आणि विठ्ठलभक्त यांच्यासंबंधी सतत ऐकत आला होता. आपणही या भक्तांप्रमाणे विठ्ठलनाम गात पंढरीला जावे; पांडुरंगाचे दर्शन घ्यावे असे त्याला सतत वाटत होते; परंतु त्याच्या मनातली ही तळमळ कितीही प्रामाणिक असली तरी व्यवहारात उतरणे शक्य नव्हते. मंगळवेढ्याच्या लोकांना चोखोबाच्या पवित्र भावनेविषयी अजिबात शंका नव्हती. चोखो-

*वाच्या तोंडून, ' जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल '* हे शब्द अत्यंत जिव्हाळ्यानें उमटत असत हेही त्यांच्या लक्षात आले होते. परंतु चोखोबाच्या विठ्ठल-भक्तीला जनरूढीनं घातलेल्या मर्यादाही त्यांना स्पष्ट दिसत होत्या. त्यामुळे चोखोबा काय किंवा त्याची बायको सोयरा काय यांना पंढरपूरला जाण्यासाठी कोणीही प्रोत्साहन देत नव्हते.

ज्या काळात महार जातीला आणि त्या जातीत जन्मलेल्या माणसांना सर्वसाधारण समाजात सामावून घेतले जात नव्हते, अशा काळात दुर्दैवाने चोखा जन्मला होता. देवभक्तीची आवड, निर्मळ आचार-विचार आणि पवित्र व्यवहार हे सर्व असूनही चोखा केवळ महार जातीतला म्हणून त्याला समाज दूर ठेवत होता. त्या दृष्टीनेच त्याच्याकडे पाहात होता. मग पंढरपूरला गेल्यावर चोखोबाला साधारण माणसाप्रमाणे विठ्ठलाच्या मंदिरात जाऊ देणार नाहीत, हे मंगळवेढ्याच्या लोकांना समजायला मुळीच अवघड नव्हते. तसेच त्यांच्या ह्या भावना चोखोबाला उमजणेही कठीण नव्हते.

पण एकदा चोखोबाला अचानक एक विचार

स्फुरला. देवदर्शन झाले नाही तरी देवमंदिराचे दर्शन आपल्याला कां घडू नये ? आपल्याला देवमूर्तींचे दर्शन घडले नाही तरी निदान त्या मूर्तींचे दर्शन घेऊन आलेली देवमाणसं तरी आपल्याला दिसणार नाहीत कां ? देवघराच्या अंतरंगाची झाडलोट नशिबात नसली, तर निदान देवघराच्या बाहेरचा परिसर झाडून काढण्याचं भाग्य आपल्याला कां मिळू नये ? अशा विचारांच्या झपाट्यात चोखोबानं निर्णय घेऊन टाकला की, आपण पंढरपूरला जायचंच !

चोखोबा सोयराला बरोबर घेऊन निघाला. पंढरीच्या वाटेनं विठ्ठल नामाचा गजर करीत जाणाऱ्या भक्तांच्या एका दिंडीमागून विठ्ठलाचे नाव घेत चोखोबा आणि सोयरा चालत राहिली. अनेक दिवसांची आपल्या मनातली इच्छा पूर्ण होणार या आनंदाच्या कल्पनेत त्यांची वाट आणि श्रम न कळत संपले.

पंढरीनगरीच्या आसमंतात पोहोचल्यावर पंढरीनाथाच्या मंदिराचा कळस दिसू लागला; त्याबरोबर चोखोबांनी आनंदानं 'विठ्ला माय बापा' अशी हाक देऊन साष्टांग दंडवत घातले. सोयरासुद्धा चोखोबाप्रमाणेच आनंदून गेली होती. गावात शिरता

शिरता ज्या दिंडीमागून चोखोबा आला होता त्या दिंडीतली माणसं गावातल्या माणसात मिसळून गेली. चोखोबा मात्र सोयराला घेऊन एका बाजूला उभा राहून एक टक देवळाच्या कळसाकडे पाहात होता आणि मधूनच तोंडानें विठ्ठलाच्या नावाचा जयजय-कार करीत होता.

पंढरपुरातला दुसरा दिवस उजाडला तो मात्र चोखोबाच्या श्रद्धेला तडा पाडणारा ठरला. चोखोबाचे विठ्ठलाशी जवळीक साधण्याचे प्रयत्न जनरूढीच्या दडपणाने दूर सारले गेले. पंढरपूरच्या रस्त्यांवरून जाणाऱ्या येणाऱ्या पांडुरंगाच्या भक्तांकडे पाहून प्रत्यक्ष पांडुरंग भेटल्याचा आनंद मानणारा चोखोबा त्या भक्तांच्या दृष्टीने रस्त्यातील एक अडगळच ठरत होता.

चोखोबा आणि सोयरा आपसात या अवहेल-नेचा विचार करीत; आपलं काय चुकलं याचा शोध घेत; परंतु उत्तर सापडत नसे. अखेर देवाच्या सेवेतच आपलं जीवन घालवावं अशा कल्पनेनं चोखोबा देवळाकडे जाणारे रस्ते आणि देवळाचा परिसर झाडून काढण्यात रंगून गेला. आपण देवाची सेवा करतो

आहोत, या भावनेचं समाधान मिळवत चोखोबा देव-ळाच्या आसपास राहूं लागला.

चोखोबा प्रत्यक्ष देवळात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊ शकत नव्हता; पण देवळांतून बाहेर येणाऱ्या भगवंताच्या भक्तांच्या तोंडून ऐकायला मिळणारे देवाचे गुणवर्णन हाच त्याचा आनंद होता. देवाच्या प्रत्यक्ष दर्शनाची इच्छा देवभक्तांच्या शब्दांतून पूर्ण झाल्याचा आनंद म्हणजे एक प्रकारे उष्टं समाधान होतं; पण त्यातही चोखा तृप्त होता. तो आर्त शब्दात म्हणायचा,

'अहो पंढरीराया विनवितो तुज । अखंड संतरज लाभो मज ॥ नामाची आवडी उच्चार हा कंठी । करि कृपादृष्टी मजवरी ॥ पंगतीचे शेष उच्छिष्ट प्रसाद । तेणे सर्व बाध हरे माझा ॥ चोखा म्हणे माझा हाचि पैं नवस । पुरवा सावकाश देवराया ॥'

पांडुरंगाच्या दर्शनाची तीव्र इच्छा मनात बाळगून सतत पांडुरंगाचे नाव घेणारा चोखोबा इतरांच्या दृष्टीनं कसाही ठरला तरी पांडुरंगाच्या दृष्टीनं तो महान भक्तच होता. लोकांनी चोखोबाला

विठ्ठलाकडं जाऊ दिलं नाही, तेव्हा विठ्ठलच चोखो-बाच्या भेटीला येऊं लागला.

विठ्ठलाच्या दर्शनाची चोखोबाची तळमळ दिवसेंदिवस तीव्र होत चालली. आता आपल्या या भक्तासाठी काहीतरी केलंच पाहिजे अशी देवालाही उत्कंठा लागली. थकून भागून विठ्ठलाचं नाव घेतंच झोपी गेलेल्या चोखोबाला एका रात्री प्रत्यक्ष विठ्ठला-नंच जागं केलं. देव–भक्तांचा संवाद झाला. पुढे एकदा देवानं चोखोबाला आपल्या देवळातल्या गाभाऱ्यात सुद्धा नेलं. असे अनेक चमत्कार घडत होते; चोखोबा देवाच्या भेटीचा आनंद मनमुराद लुटत होता. पण या अपूर्वाईचा आनंद चोखोबाला फार काळ मिळाला नाही. गावातल्या कर्मठांनी उलट त्याच्यावर देव विटा-ळल्याचा आरोप केला. देवळाच्या परिसरात राहणेही त्याला अशक्य करून सोडले.

आता चोखोबा आणि सोयरा चंद्रभागेच्या पैलतीरावर एका बाजूला झोपडी बांधून राहू लागली. देव आणि भक्त एकरूप झालेले असल्यावर त्यांची मनोमन मिळणी झालेली असल्यावर, अंतरीची ओढ प्रखर असल्यावर दूरता कसली ? चंद्रभागेचा पैलतीर

सामन्यांना मर्यादा घालणारा, पण देवाला हो त्याचे काय ?

चोखोबा आणि सोयरा आपल्या भक्तीत पूर्वीप्रमाणेच रंगली होती. देवही अनंत रूपांनी भेटून त्यांची भक्ती मान्य करीत होता. चोखोबा आणि सोयरा या दोघांनाही आपल्या भक्तीची पावती मिळाल्याची कृतज्ञता वाटत होती. अशाच एका क्षणी सोयरा चोखोबाला म्हणाली, 'धनी पांडुरंगाला एकदा आपल्या घरी कण्या खायला तरी बोलवा !'

चोखोबा सोयराची ही कल्पना ऐकून आनंदला. आपल्याला अनेकदा भेटलेला देव सोयराच्या भक्तीभावाचाही आदर करील असा त्याला विश्वास वाटला. तो तल्लीन होऊन विठोबाची आळवणी करूं लागला. सोयराही सतत भक्तीभावानें देवाला आळवत राहिली.

यानंतर एका रात्री पांडुरंगाने चोखोबाला दर्शन दिले. आणि 'उद्या जेवायला येतो' असे त्याने चोखोबाला सांगितले. चोखोबाने ही गोष्ट सोयराला सांगितली तेव्हा तिचा विश्वासच बसेना, पण चोखोबाने पुनःपुन्हा सांगितल्यावर तिलाही ते खरे वाटले

आणि मग देवाच्या जेवणाची तयारी करण्याची एकच गडबड उडाली.

देव आपल्या घरी जेवायला येणार ह्या कल्पनेनं सोयराच्या मनात असा काही उत्साह संचारला कीं तीनं कोणाकडून काही कोणाकडून काही मागण्याच्या भरात देव जेवायला येणार हेही मोकळेपणाने सांगून टाकले. बातमी गावभर पसरली 'चोखोबा आणि सोयरा यांच्या वेडेपणाची कमाल झाली' असे म्हणत गावकऱ्यांनी हा विषय थट्टेवारी नेला.

दुसऱ्या दिवशीची रात्र आली. झोपडीतल्या मिणमिणत्या प्रकाशात चोखोबा आणि सोयरा मनोमन देवाची मूर्ती आठवत तल्लीनतेनं देवाची वाट पाहू लागली. आणि काय आश्चर्य !

चोखोबाशेजारी घोंगडीवर बसून पीतांबर नेसलेला, किरीट, कुंडले घातलेला, गळ्यात वैजयंती माळ असलेला सावळा विठ्ठल सोयराला म्हणत होता, 'वाढतेस ना जेवायला? खूप भूक लागली आहे.' सोयरा भानावर आली. तिनं लगबगीनं देवाची पूजा केली. आरती उजळली आणि त्या प्रकाशात ती देवाचं रूप डोळे भरून पाहूं लागली. तिचं भानच हरपलं.

अखेर चोखोबांनी तिला सावध केली आणि नैवेद्य दाखवायची आठवण दिली.



सोयरानं अपूर्वाईनं केलेलं जेवणाचे पदार्थ विठ्ठलानं मनापासून खाल्ले. त्याला ताक तर फारच आवडले. त्याने ते पुनःपुन्हा मागून घेतले. थोडं ताक तर त्याच्या पीतांबरावर सांडलं सुद्धा !

चोखोबाकडे प्रत्यक्ष देव आला आणि सोयराच्या आग्रहानं जेवला या विषयाची थट्टा आणि कुचाळकी करणारांना दुसऱ्या दिवशी देवळातल्या विठ्ठल-

मूर्तीच्या पीतांबरावर ताकाचे डाग आढळले. या मागचं कोडं उमगणारांना उमगलं. खरे भक्त चोखोबाच्या भक्तीचं मोठेपण मान्य करून बसले. काहींनी या मागे जादूटोणा असल्याची समजूत करून घेतली. काही गर्विष्ठ माणसांनी थेट चोखोबालाच विचारले.

चोखोबा किंवा सोयरा यांनी मात्र अत्यंत कृतज्ञ भावनेनं हात जोडून सर्वांना हेच सांगितलं कीं 'देव दीनाघरी जेवला !'


'देव दीनाघरी जेवला !'

म. ग्रं. सं. ...

शा. क्र.

दिनांक

## देव दीनासाठी श्रमला



पंढरीनाथ पांडुरंगाच्या भक्तीत रमलेले अनेक लहान थोर भक्त पंढरपुरात काही थोडे नव्हते. कायम राहाणाऱ्या भक्तांसारखेच निमित्तानिमित्तानं येणारे भक्त तर कितीतरी असत. पंढरीला यावं, डोळे भरून विठ्ठलाचं दर्शन घ्यावं, मन तृप्त झालं की पुन्हा येण्याच्या निश्चयानं आपल्या गावी परत जावं, असे येणारे जाणारे भक्त पंढरपुरात नेहमीच दिसत.

जनाईच्या बाबतीत घडलं ते मात्र खरोखर आश्चर्य वाटावं असंच !

गंगाखेड गावात एका गरीब कुटुंबात तिचा जन्म झाला. आई-वडील पांडुरंगाची भक्ती करणारे. जनाईचा जन्म झाला तोही पांडुरंगाच्या कृपेचा प्रसाद असं मानण्याएवढी त्यांची पांडुरंगाची भक्ती मोठी.

त्यामुळं जनाई मोठी होऊन, म्हणजे फार तर सहा-सात वर्षांची होऊन, चालू-बोलू लागली, तेव्हा तिच्या आईवडिलांनीं तिला पांडुरंगाच्या दर्शनासाठीं पंढरपूरला आणली.

पंढरीनाथाच्या देवळात, भक्तांच्या मेळाव्यात, भजनाच्या कल्लोळात, 'विठ्ठल विठ्ठल' असा जयघोष करीत जनाई आईवडिलांबरोबर देवाच्या दर्शनाला येऊन उभी राहिली. देवाच्या मूर्तीसमोर उभी राहून जनाई एकटक देवाकडं पाहात होती. आईवडिलांनी दर्शन घेऊन, काहीं उपचार करून झाल्यावर जनाईला 'चल बाई' असं म्हटलं; पण छेः ! जनाई तिथून हालायलाच तयार नव्हती. ती म्हणाली,

'मी इथंच राहाणार. देव बघेल माझ्याकडं. तुम्ही गावाकडं जा.'

आईवडिलांनी जनाईची समजूत घालायचा खूप प्रयत्न केला, तिला धाक दाखवून आपल्या बरोबर नेण्याचाही प्रयत्न केला. पण का नी कसं कोणाला ठाऊक, जनाईच्या आईवडिलांना एकाएकी जनाई दिसेनाशी झाली. त्यांनी खूप शोधून पाहिलं; पण ती त्यांना सापडलीच नाही. अखेर, 'देवा

पांडुरंगा, आता जनाईचा सांभाळ तूंच कर, तूंच आता तिला आमच्या ठिकाणी आहेस, ती तुझ्याकडं राहिली तरी सुखात राहूं दे. तुझी मर्जी असेल तेव्हा एकदा आमच्या डोळ्यांना ती दाखव म्हणजे सगळं पावलं देवा!' असा देवाचा धांवा करीत जनाईच्या आईवडिलांनी जड पावलांनी पंढरपूर सोडलं.

एके दिवशी नामदेवाचे वडील दामाशेटी नेहेमीप्रमाणें सकाळीं विठ्ठलाच्या देवळात दर्शनासाठीं आले. त्यावेळी विठ्ठलाच्या समोर बसून, आपल्या छोटया हातांनी टाळ्या वाजवत, 'विठ्ठल विठ्ठल' असा तोंडाने जप करत बसलेली एक छोटी मुलगी दामाशेटींना दिसली. त्यांना आश्चर्य वाटलं. त्या मुलीची त्यांनी प्रेमानं चौकशी केली. जनाईनं जसं घडलं तसं सारं सांगितलं. दामाशेटी म्हणाले, 'अग मुली, पण आता पुढे तूं करणार काय? राहाणार कुठं? गावात तुझ्या कोणी ओळखीचं तरी आहे कां?'

जनाई म्हणाली, 'मला पांडुरंगाच्या शिवाय दुसरं कोणीही ओळखीचं नाही. तो सांगेल तिथं राहायचं; त्यांच नाव घ्यायचं एवढंच मला कळतं.' दामाशेटींशी जनाईचं हे बोलणं चालू असतानाच

नामदेवही देवदर्शनासाठीं आला होता. त्यानं ते बोलणं ऐकलं. त्याला जनाईचं कौतुक वाटलं. आपल्यासारखीच विठ्ठलाची भक्ती करणारी जनाई महान् भक्त असल्याचा विश्वास त्याला वाटला. पण तो काही बोलला मात्र नाही. दामाशेटी तिथे असताना आपण बोलणं बरं नाही म्हणून तो देवदर्शन करायला पुढे झाला.

दामाशेटींना नामदेव दिसला. त्यांनी त्याला म्हटलं, 'नामा आलास कां तू! फार वेळ देवळात थांबू नकोस. आज लवकर घरी ये. मी या मुलीला घेऊन पुढं जातोय.' दामाशेटींचं बोलणं ऐकून नामदेव आणि जनाई दोघंही चकित झाली आणि एकाच वेळी त्यांनी एकमेकांकडं पाहिलं. दोघांच्याही चेहऱ्यावर आनंदाची भावना उमटली. आणि दोघांनीही हात जोडून विठ्ठलाच्या मूर्तीकडं पाहात, डोळे मिटून मनापासून नमस्कार केला. त्यांच्या मनात हा योग विठ्ठलानंच घडवून आणल्याबद्दलची खात्री पटली होती.

दामाशेटींचं देवदर्शन झाल्यावर ते जनाईला घेऊन घरी गेले. घरच्या माणसांना त्यांनी जनाईची

हकीगत सांगितली. घरच्यांनी जनाईच्या वयाकडं आणि अनाथपणाकडं पाहून तिचं स्वागत केलं खरं; पण त्याचवेळी घरच्या गरीबीत ही आणखी एक जबाबदारी वाढल्याची भीती त्या माणसांच्या मनात येऊन गेलीच. जनाईला त्या नव्या माणसांना पाहून प्रथम थोडंसं बावरल्यासारखं झालं; पण लगेच ती नामदेवाच्या आईजवळ म्हणजे गोणाईजवळ जाऊन तिला नमस्कार करून म्हणाली, 'आई, मला पंढरपुरात पांडुरंगाजवळ रहायचं होतं, मला इथं नात्यागोत्याचं कुणी नाही. देवानंच मला तुमच्यासारखी आई दिली.' जनाईच्या या समजुतदार आणि लाडिक बोलण्यानं गोणाईलाही ती आवडू लागली.

यानंतर जनाई नामदेवाच्याच घरी राहू लागली. घरातली दळण–कांडण, धुणी–पाणी अशी कामं ती हौसेनं करत असे. ही कामं करताना ती कधी त्रासली नाही कीं तिनं कामात कधी हयगय केली नाही. त्यामुळं थोड्याच दिवसात घरच्या सर्वांना तिनं आपलंसं केलं. नामदेवाच्या घरीं जनाई राहात होती ती केवळ कुठेतरी निवारा मिळावा या हेतूनं, पण वेळ मिळाला कीं विठ्ठलाचं नाव घेत ती तासन्‌ तास एकाजागी

बसून असायची. तिची देवाचं नाव घेताना होणारी तल्लीनता नामदेवाच्या लक्षात आली होती. तिच्या भक्तीवेड्या मनाची ओळख नामदेवाला झाली होती. कधींकधीं त्या दोघांचा एकमेकांशी संवादही होत असे.

'नामदेवा देव आहे तरी कसा ? मला दिसेल, भेटेल कां रे तो दिनानाथ ?' असें जनाईचे प्रश्न असत. तर 'अग देव न भेटायला काय झालं; आणि देव लांब तरी कुठें आहे ? 'काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल ।' असं त्याचं मर्म आहे. तूही प्रयत्न कर, तुलाही उमजेल.' अशी नामदेवाची त्यावर उत्तरे असायची. नामदेव आणि जनाई यांच्यातील अशा प्रकारच्या संवादातूनच जनाई खूप काहीं शिकत होती.

नामदेवाच्या घरी कष्ट करणारी जनाई आणि मनापासून विठ्ठलाची भक्ती करणारी जनाई, अशी जनाईची दोन वेगवेगळी रूपं हळूहळू आकाराला येत होती. होता होता जनाईच्या अंतरंगात देवाविषयीचं ज्ञान उजळूं लागलं; जनाई भक्तीचं मर्म उमजली, आपल्याला कोणती पायरी गाठायची आहे याचा तिला उलगडा झाला. आता तिच्या वागण्या-बोलण्यात

वेगळेपण जाणवूं लागलं. हा तिच्यामधें होणारा बदल नामदेवाच्या नजरेतून सुटला नाही.

'येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥' अशा प्रकारच्या अभंगाच्या ओळी जनाईच्या तोंडून सहज निघत. त्यामागची आर्त जाणीव इतरांच्या लक्षात आली नाही तरी नामदेवाच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. तसेच निमित्ता-निमित्तानं नामदेवाच्या घरी येणारे संत जनाईच्या भक्तीची योग्यता समजू लागले. ज्ञानदेव, नामदेव हे जनाईच्या प्रगतीविषयी आपसात बोलत. हळूहळू पंढरपुरात राहणाऱ्या आणि बाहेरून येणाऱ्या भक्तमंडळीत जनाईची विठ्ठलभक्ती मान्यता पावली. ज्ञानदेवाची छोटी बहीण मुक्ताई ही तर जनाईची सखी झाली. परंतु जनाई आपला नम्र भाव न सोडता वागत असे. स्वतः रचलेल्या अभंगात ती स्वतःचा उल्लेख 'नामयाची दासी जनी' असा करी.

संतमेळ्यात सामावून गेलेली जनाई आता विठ्ठलाचीही आवडती झाली होती. जनाईचे कष्ट कमी करावे म्हणजे ती अधिकाधिक भक्तीच्या आनंदात रंगून जाईल, या जाणिवेनं विठ्ठल तिला तिच्या

कामातही इतरांना कळूं न देता मदत करी. एक नामदेव सोडला तर घरच्या इतर माणसांना हे गुपित समजत नव्हते. त्यांना एवढंच आश्चर्य वाटत राही कीं पहाटे उठून एवढं दळण जनाई दळते तरी कशी ? घरचे केरवारे, भांडी घासणं, धुणी धुणं ही कामं जनाई एवढ्या झपाट्यानं उरकते ते तरी कशी ? घरच्या कामाचा एवढा पसारा उरकून पुन्हा फावल्या वेळात देवाचं नाव घेत बसायला या जनाईला एवढा उत्साह येतो तरी कसा ? पण यामागं जनाईची विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलाचं भक्तप्रेम उभं होतं.


आता जनाई मनोमन विठ्ठलाची झाली होती.
' विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ॥ '
' आता जीव जाऊ पाहे । धांव घाली माझे माये ॥ '
' सर्व सुख पायीं लोळे । जनी संगे विठ्ठल बोले ॥ '
अशा एकामागून एक अभंगाच्या ओळी जनाईच्या मुखातून निघत. ज्ञानदेव, नामदेव, मुक्ताई, गोरोबा यासारख्या संतांना जनाईच्या या बोलांचं कौतुक वाटे. प्रत्यक्ष पंढरीनाथ सुद्धा सुखावत. जनाईच्या भक्तीभावाची श्रेष्ठता देवालाही मान्य झाली.

अशीच एक दिवस जनाई काम संपवून निवांत बसली होती. तिच्या मनाची एकतानता झाली होती. ती विठ्ठलाच्या रूपाशी जणूं एकरूप झाली होती. याच अवस्थेत तिच्या तोंडून शब्द बाहेर पडू लागले.

'सख्या पंढरीच्या राया । घडे दंडवत पाया ॥
ऐसे करी अखंडित । शुद्ध प्रेम शुद्ध चित्त ॥
वेध माझ्या चित्ता । हाचि लागो पंढरीनाथा ॥
जावो ओवाळुनी । जन्मोजन्मी म्हणे जनी ॥'

विठ्ठलासमोर तल्लीन होऊन जनाई गाऊ लागली होती.

'सख्या पंढरीच्या राया । घडे दंडवत पाया ॥'




BVBK-0401279

देवाला जनाईची भावना पाहून भरून आलं. त्यानं दौत-लेखणी घेऊन जनाईच्या तोंडून निघणाऱ्या अभंगांचं लिखाणच सुरू केलं. जनाई तल्लीन होऊन गात होती, देव भराभरा ते शब्द लिहीत होता.

या अपूर्व क्षणीच नामदेव, ज्ञानदेवांसह तेथे आले. त्यांनी मन एकाग्र करून विठ्ठलाचं ध्यान करायला आरंभ केला. कांहीं वेळानंतर जेव्हा त्यांच्या अंतर्दृष्टीला विठ्ठलाचं दर्शन घडलं, तेव्हांचं त्या विठ्ठलाचं दर्शन कांहींसं अपूर्वच होतं. एका चौरंगा-समोर बसून, दिव्याच्या मंद प्रकाशात, लेखणीनं भराभरा कांहीं लिहिणारा देव त्यांना दिसला. देवाशी मनोमन संवाद साधणाऱ्या त्या श्रेष्ठ भक्तांनी देवाला प्रश्न केला, ' देवा आपण स्वतः काय लिहिता आहांत?' त्यावर देव म्हणाले, ' अरे बाबांनो, लेखन-वाचन न झालेल्या जनाईच्या मुखातून बाहेर पडणारे रसाळ शब्द वाऱ्यावर विरून कां जाऊ द्यायचे ? म्हणून मीच ते लिहितो आहे. '

ज्ञानदेव नामदेव काय घडतं आहे त्याचा अर्थ उमजले. जनाईच्या भक्तीभावानं विठ्ठलाला

जिकल्याची त्यांना खात्री पटली. जनाईच्या संबंधीचा त्यांचा आदर वाढला. ज्ञानदेव सहजच नामदेवाला म्हणाले, ' धन्य जनाई ! धन्य तिची भक्ती ! अरे नामया जनाईसाठी देव कष्टला ! '

' देव दीनासाठी श्रमला ! '

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
विभाग.
बा. क्र. १२८९ दि. ३।८।८९
विषय... क्र...........